आर्थिक वर्षांच्या अखेरीस खरेदीच्या प्रस्तावांबाबत करावयाची कार्यवाही.....

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१८/प्र.क्र. १७/२०१८/कोषा प्रशा - ५

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १४ मार्च, २०१८.

संदर्भ : शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक २९ जानेवारी ,२०१८

शासन परिपत्रक –

संदर्भाधीन दि. २९.०१.२०१८ च्या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने, खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.:-

मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून दि. १ फेब्रुवारी, २०१८ नंतरच्या खरेदीस "विशेष बाब" म्हणून मंजूरी देण्यासंदर्भात अनेक प्रस्ताव वित्त विभागाच्या विविध कार्यासनांस सातत्याने प्राप्त होत आहेत. तथापि, सदर प्रस्ताव दि.२० मार्च,२०१८ नंतर प्राप्त झाल्यास, सदर प्रस्तावांस "विशेष बाब" म्हणून मान्यता देणे, तद्नंतर सदर विभागांकडून खरेदी करणे, खरेदीची देयके कोषागारांत सादर करणे तसेच सदर देयके पारित करणे या कार्यपध्दतीसाठी पुरेसा अवधी मिळू शकत नाही. शेवटच्या क्षणी प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची छाननी वेळेअभावी वित्त विभागाकडून होऊ शकत नाही. तसेच अशा प्रकारे मंजूरी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सादर झालेली देयके पारीत करण्यापूर्वी आवश्यक छाननीकरीता कोषागारांना देखील पुरेसा अवधी मिळू शकत नाही. एकूणच यामुळे मोठी अनियमितता होण्याची शक्यता असते.

वित्त विभागास प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यास पुरेसा कालावधी मिळावा तसेच कोषागारांना देयके पारीत करण्यापूर्वी आवश्यक छाननीकरीता पुरेसा कालावधी मिळावा याकरीता विविध प्रशासकीय विभागांकडून दि.२९ जानेवारी, २०१८ च्या परिपत्रकाच्या अनुषंगाने प्राप्त होणारे खरेदीचे प्रस्ताव **दि. २३ मार्च, २०१८ नंतर** वित्त विभागाकडून स्वीकारले जाणार नाहीत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेताक २०१८०३१४१३३६२४९४०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anudeep Shrinivas Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75f50c6671abf79e06e7d05c1f27cdae17ad6b947f5b0d740fa705320bede741, cn=Anudeep Shrinivas Dighe
Date: 2018.03.14 13:38:48 +05'30'

(अनुदीप दिघे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
३. राज्यपालांचे सचिव.
४. मुख्यमंत्र्यांचे सचिव
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

७. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४०००0२
१४. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५. संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई
२६. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
२७. सहसंचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती
२८. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
२९. सहसंचालक,स्थानिक निधी लेखा मुंबई /पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
३०. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३१. निवड नस्ती कोषा प्र.५.